# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेने केली ३० जून पर्यंत प्रथमच रू. ११७ कोटीची विक्रमी वसूली**
- **ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरणा करण्यास नागरिकांची विशेष पसंती**
- **३१ जुलै २०२४ पूर्वी संपूर्ण मालमत्ता कर रक्कम भरणा केल्यास ३% सवलतिची सुवर्ण संधी उपलब्ध**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यापासून प्रथमच दिनांक ३० जून २०२४ रोजी पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेने मालमत्ता कर रू. ११७ कोटीची विक्रमी वसूली केलेली आहे. प्रथमच विक्रमी मालमत्ता कर वसुली झाल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरवासीयांचे आभार व्यक्त केले आहे. मालमत्ता कर वसुली उद्दिष्ट १००% पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित केलेल्या pg.mbmc.gov.in व MyMBMC मोबाईल अॅप, Google Pay, Paytm व अन्य ऑनलाईन माध्यमाचा करून मालमत्ता कर भरणा करण्यासाठी नागरिकांनी विशेष पसंती दिली आहे. माहे एप्रिल महिन्यात मालमत्ता कराची बिले ही नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली होती. ऑनलाईन पद्धतीला विशेष पसंती देत ८४,०९१ नागरिकांनी Google Pay, Paytm, Phone Pe, BHIM अॅप व POS मशीनचा वापर करून एकूण रू. ५६,२८,४१,२८४/- इतका कर भरणा केला आहे. तर ५०,०७३ नागरिकांनी रोख रक्कम द्वारे रू. २०,२२,५९,३३१/-, चेकद्वारे ५१,४०४ नागरिकांनी रू. ४०,५१,८२,३५१/- व डीडीद्वारे ५०७ नागरिकांनी रू. ९६,९६,२०५/- इतका कर भरणा केलेला आहे. यामध्ये एकूण १,८६,०७५ मालमत्ता धारकांनी कर भरणा करून मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य केले आहे. आतापर्यंत एकूण रू. ११७,९९,७९,१७१/- इतकी मालमत्ता कर वसुली करण्यात आली आहे अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांनी दिली. मागील वर्षी ३० जून २०२३ रोजी पर्यंत ६० कोटी इतकी कर वसुली झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी मालमत्ता कर वसुलीमध्ये वाढ झालेली आहे.

५% सवलत योजनेचा १ लाख ८५ हजार ५५० नागरिकांनी लाभ घेतला असल्याने रू. ११७ कोटीचा इष्टांक महापालिकेने पार पाडला आहे. ३१ जुलै २०२४ पूर्वी संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा केल्यास ३% सवलत योजना महापालिकेने लागू केली आहे. ३१ जुलै २०२४ पूर्वी संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा न केल्यास त्या मालमत्ता धारकांना माहे एप्रिल, मे, जून व जुलै असे प्रतीमहिना २% दराने व्याज आकारणी करण्यात येणार असल्याचे नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन मालमत्ता कर विभागामार्फत करण्यात येत आहे. मा. आयुक्त यांनी सर्व करदाता, माजी सदस्य, पत्रकार बंधू यांचे आभार व्यक्त केले आहे तसेच सर्व नागरिकांनी ऑनलाईन सुविधा MyMBMC अॅप किंवा pg.mbmc.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन तसेच Google Pay, Paytm व अन्य ऑनलाईन माध्यमांचा वापर करून मालमत्ता कराचा भरणा करावा आणि मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.